# ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच

(विद्युत कायदा, २००३ अंतर्गत कलम ४२ (५) अन्वये स्थापित )

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## जळगाव परिमंडळ


दुरध्वनी क्र. ०२५७ – २२७३००४
Email :-cgrfjalgaonzone@gmail.com

ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच
जुनी एम.आय.डी.सी.
महावितरण विश्राम गृहाजवळ,
अजिंठा चौफुली ,जळगाव ४२५ ००३


जा.क्र: स.स./ग्रागानिमं/जप/ज.मं./जळगाव/०८–२०१५–१६/ No 00010 दिनांक : २६/०२/२०१६

(रजिष्टर पोच व्दारे)

गाऱ्हाणे दाखल दिनांक : १५/०१/२०१६
निकाल दिनांक : २६/०२/२०१६

प्रति,

१) मे.पुष्कर आईस प्लांट,
कराब शिवार, कोठली रोड, भडगाव,
ता.भडगाव, जि.जळगाव.
(ग्राहक क्र. १२८०१००३९५२१ ) } तक्रारदार

२) नोडल अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वितरण कंपनी.मर्या.
विद्युत भवन, मंडळ कार्यालय,
जळगाव.
३) कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वितरण.कंपनी.मर्या.
विभागिय कार्यालय, पाचोरा } विज वितरण कंपनी

---

## निर्णयपत्र

मे.पुष्कर आईस प्लांट, करार शिवार, कोठली रोड, भडगाव, ता.भडगाव,जि.जळगाव हे विज वितरण कंपनीचे औद्योगिक प्रवर्गाचे ग्राहक आहेत. त्यांना वितरण कंपनीकडुन ऑक्टोबर २०१३ ते मे २०१५ या काळात रात्रीच्या वीजवापरात असलेली सवलत मिळाली नाही. याबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण समितीकडे तक्रार दाखल केली .परंतु सुनावणी होऊनही आजपर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नाही. म्हणून ग्राहकाने त्यांचे गाऱ्हाणे अनुसुची 'अ'मध्ये मंचाकडे सादर केले. ते मंचाकडे आवक क्रमांक ०५ अन्वये दि.१५.०१.२०१६. रोजी नोंदविण्यात आले.

मंचाच्या अध्यक्षांशी सल्लामसलत करून हे प्रकरण सुनावणीस घेण्याचा निर्णय घेण्यात आला. गाऱ्हाणे अर्जाची सुनावणी मंचाच्या कार्यालयात दि.०९.२.२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता निश्चित करण्यात आली. या संबंधीची सुचना तक्रारदार ग्राहक व वितरण कंपनीच्या संबंधीत अधिकाऱ्याना दि.२५.०१.२०१६ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आली. याच पत्रासोबत तक्रार अर्जाची प्रत नोडल अधिकारी, जळगाव मंडळ कार्यालय, जळगाव व कार्यकारी अभियंता, पाचोरा विभाग यांना देवुन तक्रार अर्जानुसार मुद्देनिहाय अभिप्राय १५ दिवसाच्या आत मंचाकडे सादर करण्याबाबत व त्याची प्रत ग्राहकाला पोचविण्याबाबत सुचित करण्यात आले.



Scanned by CamScanner

सुनावणीस विद्युत वितरण कंपनीच्या भडगाव उपविभागीय कार्यालया तर्फे उपकार्यकारी अभियंता, श्री.आर.बी.शुक्ला ,व सहाय्यक लेखापाल श्री आर.बी गिरासे, तर जळगाव प्रविभाग कार्यालयाकडुन अधिक्षक अभियंता, श्री संजय आकोडे, व श्री आर.एफ. पवार, प्रभारी नोडल अधिकारी तथा अति.कार्यकारी अभियंता हे उपस्थित होते. तसेच जळगाव परिमंडळाच्या कनिष्ठ विधी अधिकारी श्रीमती सपना बनपट्टे उपस्थित होत्या. तर ग्राहक श्री. गोपालकृष्ण वनजी चौधरी हे स्वतः व त्यांचे पुत्र श्री. हरिष चौधरी उपस्थित होते.

**ग्राहकाचे म्हणणे:**

१. ग्राहकास वितरण कंपनीकडुन रात्रीच्या वीजवापरात असलेली सवलत मिळाली नाही.
२. याबाबत तक्रार अधिक्षक अभियंता जळगाव यांचेकडील ग्राहक गाऱ्हाणे निवारण कक्षाकडे दि. १५/१२/२०१४ रोजी केली. त्यानंतर पुन्हा दि.०६/०७/२०१५ ला अर्ज केला. त्यावर दि. १३/०८/२०१५ व दि.२१/०८/२०१५ रोजी सुनावणी होऊन पत्र क्र. अअ/जळगाव /अ.गा.वि.कं/नं.०३२४४, दि.०९.०९.२०१५ द्वारे निर्णय देण्यात आला. पण त्यावर उपकार्यकारी अभियंता, उपविभाग भडगाव यांनी कोणत्याही प्रकारची दखल घेतली नाही. म्हणुन मंचाकडे दि. १४/०१/२०१६ रोजी तक्रारी अर्ज दाखल केलेला आहे. दोन महिन्याचे आत निकाल लागु शकतो. परंतु सदरहु कार्यालयाने विलंब लावलेला आहे.
३. तसेच माहे सप्टेंबर २०१३ ते जुलै २०१४ या कालावधीसाठी वितरण कंपनीने अतिरिक्त विज आकार, मागणी आकार व अतिरिक्त इंधन अधिभार जादा घेतला आहे. यावर विद्युत अपिलीय प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी आदेश क्र. २९५/२०१३ ,दि. २२/०८/२०१४ अन्वये निकाल दिलेला असून त्यानुसार "वितरण कंपनीने वसूल केलेले अतिरिक्त वरील पैसे व्याजासह परत करावेत" असे आदेश दिलेले आहेत.

**ग्राहकाच्या मागण्या:**

१. वितरण कंपनीकडुन रात्रीच्या वीजवापरात असलेली सवलत मिळावी.
२. माहे सप्टेंबर २०१३ ते जुलै २०१४ या कालावधीसाठी वितरण कंपनीने अतिरिक्त विज आकार, मागणी आकार व अतिरिक्त इंधन अधिभारापोटी जादा वसूल केलेली रक्कम व्याजासह परत करावी.

**वितरण कंपनीची बाजु:**

वितरण कंपनीचे संबंधीत नोडल अधिकारी तथा कार्यकारी अभियंता जळगाव मंडळ, यांनी त्यांचा खुलासा कळविलेला नाही. परंतु उपकार्यकारी अभियंता, भडगाव उपविभाग यांचे पत्र क्र.४८ दि.१९.०१.२०१६ च्या पत्रान्वये ग्राहकास उद्देशुन दिलेल्या पत्रातील सादर केलेला खुलासा खालील प्रमाणे आहे :

१. रात्रीच्या वीज वापरात (ए–झोन) वीज बिलात दिलेली सवलत माहे ऑक्टोबर–२०१३ ते मे–२०१५ पर्यंत ग्राहकास मिळालेली नाही. खालील तक्त्यानुसार ग्राहकाने (ग्रा. क्र. ११८०१००३९५२१ ) वापरलेल्या (ए –झोन) मधील युनिटचे रूपये २.५ पै. प्रमाणे सवलत देण्यात येत आहे:

| Month | A ZONE UNIT | RATE | REBATE |
|---|---|---|---|
| OCT-13 | 0 | 2.5 | 0 |
| NOV-13 | 306 | 2.5 | 765 |
| DEC-13 | 306 | 2.5 | 765 |
| JAN-14 | 0 | 2.5 | 0 |
| FEB-14 | 956 | 2.5 | 2390 |
| MAR-14 | 193 | 2.5 | 182 |
| APR-14 | 2207 | 2.5 | 5517 |
| MAY-14 | 3097 | 2.5 | 7742 |
| JUN-14 | 1387 | 2.5 | 3467 |
| JUL-14 | 63 | 2.5 | 157 |
| AUG-14 | 136 | 2.5 | 340 |
| SEP-14 | 375 | 2.5 | 937 |
| OCT-14 | 354 | 2.5 | 885 |
| NOV-14 | 456 | 2.5 | 1140 |
| DEC-14 | 345 | 2.5 | 862 |
| JAN-15 | 324 | 2.5 | 810 |



Scanned by CamScanner

| Month | A ZONE UNIT | RATE | REBATE |
|---|---|---|---|
| FEB-15 | 1202 | 2.5 | 3005 |
| MAR-15 | 1482 | 2.5 | 3705 |
| APR-15 | 2348 | 2.5 | 5870 |
| MAY-15 | 3196 | 2.5 | 7990 |
| | 18733 | | 46529 |

**अंतर्गत तक्रार निवारण कक्षाची कार्यवाहीः :-**

अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, जळगाव मंडल, कार्यालय येथे दि. ०६/०७/२०१५ रोजी प्राप्त झालेल्या तक्रारीची दि. १३ व २१ ऑगस्ट २०१५ रोजी सुनावणी होऊन दि. ०९/०९/२०१५ च्या पत्रान्वये रोजी पुढीलप्रमाणे निर्णय देण्यात आला.

१. *आपला ग्राहक क्रमांक ११८०१०००३९५२१ औद्योगिक ग्राहकाचे नोव्हे–२०१३ ते जुलै –२०१५ पर्यंतचे जे रिडींग स्लॉटवाईज उपलब्ध असतील ते विचारात घेवुन ०८.०९.२०१५ पर्यंत टी.ओ.डी. टॅरीफ नुसार बिल दुरूस्ती करून देण्यात यावे.*
२. *इंधन भाराचे परिपत्रक ग्राहकास उपलब्ध करून देण्यात यावे असे आदेश उपकार्यकारी अभियंता भडगाव यांना देण्यात आले आहे.*

**मंचाचे निश्कर्षः**

१. उपकार्यकारी अभियंता भडगाव उपविभाग यांनी पत्र दि. १९.०१.२०१६ द्वारे ग्राहकास माहे ऑक्टोबर –२०१३ ते मे–२०१५ पर्यंतच्या कालावधीसाठी रात्रीच्या वीज वापरात (ए –झोन) वीज बिलात सवलत मान्य केली असून एकूण रु. ४६,५२९/– परत करण्याचे मान्य केले आहे. मंचाच्या सुनावणीत ग्राहकास सर्व हिशोब समजून देण्यात आला.
२. सुनावणी दरम्यान ग्राहकाने “आम्हांस देण्यात येणाऱ्या सवलतीबाबत पत्रात नमुद केलेले युनीटस व रकमेची दिलेली सवलत मान्य असुन त्याबाबत कोणतीही तक्रार नाही” असे पत्र दिले आहे. त्यामुळे रात्रीच्या वीज वापरातील वीज बिलात सवलतीच्या तक्रारीचा निपटारा झाला आहे. ही रक्कम वितरण कंपनीने पुढील देयकात समायोजित करावी , असे निर्देश मंच देत आहे. मात्र ही सवलत देण्यास वितरण कंपनीने विलंब केला असल्याने रक्कम परत करावयाच्या दिनांकापर्यंत रिजर्व बँकेच्या दराने ग्राहकास विद्युत अधिनियम ,२००३ च्या कलम ६२(६) नुसार व्याज अनुज्ञेय आहे. याबाबत झालेल्या विलंबाची चौकशी कार्यकारी अभियंता , पाचोरा यांनी करून दोषी कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी.
३. माहे सप्टेंबर २०१३ ते जुलै २०१४ या कालावधीसाठी वितरण कंपनीने अतिरिक्त विज आकार, मागणी आकार व अतिरिक्त इंधन अधिभारापोटी जादा वसूल केलेली रक्कंम व्याजासह परत करावी, अशी मागणी विद्युत अपिलीय प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या आदेश क्र. २९५/२०१३ ,दि. २२/०८/२०१४ च्या अनुषंगाने केली आहे. या विषयाची पार्श्वभूमी पुढे दिली आहे.
४. “अतिरिक्त वीज आकार”(Additional Energy Charges-AEC) वसूल करण्याची परवानगी देणारे ३ आदेश महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाने वितरण कंपनीला प्र.क्र. २८/२०१३ , दि. ०३/०९/२०१३ , प्र.क्र. ४४/२०१३ , दि. ०४/०९/२०१३ व प्र.क्र. ९५/२०१३ , दि. ०५/०९/२०१३ असे दिले . या आदेशांच्या अनुषंगाने वितरण कंपनीने वाणिज्य परिपत्रक क्र. २०९ दि. ०७/०९/२०१३ जारी करून खालीलप्रमाणे अतिरिक्त आकार वीज ग्राहकांकडून वसूल करावेत असे निर्देश जारी केले :
   - ✓ अतिरिक्त वीज आकार–३ (AEC-3):महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी म. च्या मागणीप्रमाणे स्थिर आकाराद्वारे वसुली ( संदर्भ– महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग आदेश दि. ०३/०९/२०१३ प्र.क्र. २८/२०१३ )
   - ✓ अतिरिक्त वीज आकार–४ (AEC-4): महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी म. च्या मागणीप्रमाणे स्थिर आकाराद्वारे वसुली ( संदर्भ– महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग आदेश दि. ०४/०९/२०१३ प्र.क्र. ४४/२०१३)



Scanned by CamScanner

✓ इंधन समायोजन आकार (FAC): महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी म. च्या मागणीप्रमाणे चल आकारातील बदलामुळे होणारी झळ भरून काढण्यासाठी ( संदर्भ– महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग आदेश दि. ०४/०९/२०१३ प्र.क्र. ४४/२०१३)

✓ अतिरिक्त वीज आकार–१(AEC-1): केवळ सप्टेंबर २०१३ ते फेब्रुवारी २०१४ या सहा महिन्यासाठी ( संदर्भ –महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग आदेश दि. ०५/०९/२०१३ प्र.क्र. ९५/२०१३)

✓ अतिरिक्त वीज आकार–२ (AEC-2): सप्टेंबर २०१३ पासून आयोगाने नवीन दर पत्रक ठरवेपर्यंत ( संदर्भ महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग आदेश दि. ०५/०९/२०१३ प्र.क्र. ९५/२०१३)

५. मात्र मे. टाटा मोटर्स लि. यांनी विद्युत नियामक आयोग प्र.क्र. ९५/२०१३ च्या आदेश दि. ०५/०९/२०१३ ला मां. विद्युत अपिलीय प्राधिकरण, यांच्या कडे आव्हान दिले. यावर मा. प्राधिकरणाने आदेश (क्र. २९५/२०१३) दि. २२/०८/२०१४ द्वारे खालील निर्देश दिले:

"......

*(c) We, therefore, set aside the Impugned Order and remand the matter to the State Commission to give opportunity to the parties concerned as per the provisions of Section 64 of the Electricity Act and hear the matter in a transparent manner and pass the final order uninfluenced by its earlier findings, as expeditiously as possible. We want to make it clear that we are not giving any opinion on the merits. ...."*

या आदेशानुसार नियामक आयोग प्र.क्र. ९५/२०१३ वरील आदेश दि. ०५/०९/२०१३ रद्द करून आयोगाने पारदर्शी पद्धतीने विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ६४ चे पालन करून पुन्हा अंतिम आदेश जारी करावा असे आयोगास सूचित केले आहे. मात्र आयोगाच्या निर्णयावर कुठलेही मत नोंदवले नाही. तसेच सदर आदेशात तक्रारदार यांनी नमूद केल्याप्रमाणे "वितरण कंपनीने वसूल केलेले अतिरिक्त वरील पैसे व्याजासह परत करावेत" असे कुठलेही निर्देश नाहीत.

६. मां. विद्युत अपिलीय प्राधिकरण, यांच्या वर संदर्भीय आदेशाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाने विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ६४ चे पालन करून ग्राहक व जनतेच्या आक्षेपांची दखल घेवून या विषयावर अंतिम आदेश दि. २६/०६/२०१५ (प्र.क्र. ९५/२०१३ व एम.ए. १८५/२०१४ ) रोजी पारित केला. त्यानुसार :

"................

*15. The cost components of AEC-1 & AEC-2 were approved by the Commission in the respective Orders following due regulatory process. However, these cost components were not allowed to be recovered by MSEDCL from its consumers in those Orders. The Commission is of the view that allowing the recovery of these costs to MSEDCL is justifiable and necessary.*

*16. The Commission has scrutinised the rates at which AEC-1 and AEC-2 were applied by MSEDCL in terms of the principles adopted by the Commission. The total category-wise AEC charged by MSEDCL is less than the amount of costs allowed to be recovered, and the category-wise rates levied are also lower than if the principles had been correctly applied. Hence, the question of allowing carrying cost for over-recovery does not arise.*

*17. However, MSEDCL shall review the refunds made by it so far on account of wrongful premature billing, and make any remaining refunds due to consumers in the next billing cycle. ...."*

या आदेशांचे अवलोकन केले असता मा. आयोगाच्या आदेश दि. ०५/०९/२०१३ नुसार मागितलेले अतिरिक्त वीज आकार रद्द झालेले नाहीत. फक्त यात आदेश दि. ०५/०९/२०१३ च्या निर्देशात नमूद केलेला कालावधी सोडून चुकीच्या कालावधीसाठी AEC-1व AEC-2वसूल केलेला असल्यास ते परत करावेत , असे आदेश दिले आहेत. मा. आयोगाने वितरण कंपनीच्या वर्ष २०१३–१४ ते २०१५–१६ साठी दरपत्रक मंजुरीच्या याचिकेवर (प्र. क्र. १२१/२०१४) दि. २६/०६/२०१५ रोजी आदेश देवून नवीन दर दि. ०१/०६/२०१५ ला लागू केले आहेत.

७. त्यामुळे माहे सप्टेंबर २०१३ ते जुलै २०१४ या कालावधीसाठी वितरण कंपनीने अतिरिक्त विज आकार, मागणी आकार व अतिरिक्त इंधन अधिभारापोटी जादा वसूल केलेली रक्कम व्याजासह परत करावी, ही मागणी सरसकटपणे मान्य करता येणार नाही. मात्र सदर ग्राहकाची फेब्रुवारी २०१४ नंतरही AEC-1ची वसुली केली असेल तर ती रक्कम, परत करावयाच्या दिनांकापर्यंत रिजर्व बँकेच्या दराने व्याजासह परत करावी, असे मंच सूचित करीत आहे.



Scanned by CamScanner

ग्राहकाचे प्रतिनिवेदन, विद्युत वितरण कंपनीचा खुलासा व सादर करण्यात आलेली कागदपत्रे या सर्व बाबींचा विचार करून मंच या प्रकरणी खालील प्रमाणे निर्णय देत आहे.

## निर्णय

१. रात्रीच्या वीज वापरातील (ए–झोन) वीज बिलासाठी सवलत न दिल्यामुळे येणारी माहे ऑक्टोबर –२०१३ ते मे–२०१५ या काळातील फरकाची रक्कम रु. ४६,५२९/– परत करावयाच्या दिनांकापर्यंत रिजर्व बँकेच्या दराने व्याजासह, या आदेशाच्या दिनांका नंतर येणाऱ्या ग्राहकाच्या देयकात समायोजित करावी.

२. तक्रारदार ग्राहकास फेब्रुवारी २०१४ नंतरही AEC-1लावलेले असतील तर त्यापोटी वसूल केलेली जादा रक्कम, परत करावयाच्या दिनांकापर्यंत रिजर्व बँकेच्या दराने व्याजासह, या आदेशाच्या दिनांकानंतर येणाऱ्या ग्राहकाच्या देयकात समायोजित करावी.

३. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ), विनियम २००६ मधील नियम क्र. ६.१२ नुसार नोडल अधिकारी यांनी या आदेशाच्या पूर्ततेचा व आदेशातील दखल पात्र निष्कर्ष यांवरील कारवाईचा अहवाल मंचाकडे एक महिन्याच्या आत सादर करावा.

४. निर्देशित कालावधीत वितरण कंपनीने या आदेशाची अमंलबजावणी न केल्यास म.वि.नि.आ. (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल), विनियम २००६ मधील नियम क्र. २२ अन्वये तक्रारदार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे दाद मागू शकतात.

५. या निर्णया विरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असल्यास, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल), विनियम २००६ मधील नियम क्र. १७.२ नुसार मा. विद्युत लोकपाल यांचेकडे , (व्दारा – महाराष्ट्र वीज नियामक आयोग, ६०६ “केशवा” बंगला, बांद्रा कॉम्पलेक्स (पुर्व) मुंबई–४०००५१) येथे या आदेशाच्या दिनांकापासून ६० दिवसाच्या आत ते अपील करु शकतात.

| | | |
|---|---|---|
| — सही — | — सही — | — सही — |
| धनंजय कि. मोहोड | राजन सि. कुलकर्णी | सुरेश पां. वाघ |
| सदस्य-सचिव | सदस्य | अध्यक्ष |

**ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, जळगाव परिमंडळ**

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषितः

१. मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.(मर्या.),विद्युत भवन, परिमंडळ कार्यालय, जळगांव

२. अधिक्षक अभियंता म.रा.वि.वि.कं.(मर्या.) मंडळ कार्यालय,जळगांव

**सदस्य-सचिव/कार्यकारी अभियंता**
**म. रा. विज वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच**
**जळगाव परिमंडळ, जळगांव**

Scanned by CamScanner